March - 2019

क्र. ७१९१ २५/३/१९ विधी (11)

जोडपत्र "अ"

(नियम ३ पहा)

# राज्य माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अर्जाचा नमुना

प्रति,
मा. शासकीय माहिती अधिकारी,
विधी विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर पश्चिम, ता. जि. ठाणे.

10रु. COURT FEE Rs.10 भारत INDIA 0 7 DEC 2018 दस रुपये TEN RUPEES

भाईंदर महानगरपालिका
विधी विभाग
आवक क्र. ११ मा. अ.
दिनांक: २७/३/१९

१) अर्जदाराचे संपुर्ण नाव : सजी आय. पी,

२) पत्ता : शॉप नं. ८, हॅपी होम अपार्टमेंट,
बिल्डींग नं. १, शांती पार्क, मिरा रोड पुर्व
ता. जि. ठाणे.
मो. नं. : ९८२०२२६७११

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील : भरत मिठालाल जैन, यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे बोध चिन्ह असलेले लेटर पॅड, अनधिकृत रित्या वापरल्याबाबत कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता दिनांक १३.०२.२०१९ रोजी दिलेल्या अर्जावर आपल्या विभागामार्फत केलेल्या कार्यवाहीची सर्व माहीती मिळण्याबाबत.

(एक) माहिती विषय : १. गुन्हा दाखल केल्या असल्यास त्या संदर्भात संपुर्ण माहीती.

२. आपणां विभागामार्फत केलेल्या इतर सर्व कार्यवाही माहीती मिळण्यावावत.

(दोन) माहितीशी संबंधित कालावधी : दिनांक १३.०२.२०१९ ते आतापर्यंत

(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन : वरील प्रमाणे.

(चार) माहिती टपालाद्वारे किंवा व्यतीशः आवश्यक आहे किंवा नाही कसे (प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरीक्त शुल्कामध्ये सामाविष्ट केला जाईल). : व्यक्तीश:

४) अर्जदार दारिद्रय रेषेखालील आहे किंवा नाही : नाही

सही

ठिकाण : मिरारोड
दिनांक: २५.०३.२०१९

(सजी आय पी)

०१८

सजी आय.पी,
पत्ता ः शॉप नं.८, हॅपी होम अपार्टमेंट,
बिल्डींग नं.१, शांती पार्क, मिरा रोड पुर्व
ता.जि.ठाणे. ४०१ १०७.
मो.नं. ः 9820226711
दिनांक ः १३.०२.२०१९

प्रति,
मा.महापौर,
मिरा भाईदर महानगरपालिका,
भाईदर पश्चिम, ता.जि.ठाणे.

मा.आयुक्त सो.,
मिरा भाईदर महानगरपालिका,
भाईदर पश्चिम, ता.जि.ठाणे.

मा.नगरसचिव,
मिरा भाईदर महानगरपालिका,
भाईदर पश्चिम, ता.जि.ठाणे.

मा.विधी अधिकारी,
मिरा भाईदर महानगरपालिका,
भाईदर पश्चिम, ता.जि.ठाणे.

पोच
13/02/19
लिपिक
विधी विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय ः मिरा भाईदर महानगरपालिकेच्या बोध चिन्ह असलेले लेटर पॅड अनधिकृत वापल्याबाबत संबधीतावर कायदेशीर कार्यवाही करणेबाबत.**

महोदय,

वरील विषयांच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, माझ्या सदनिका क्र. वी/०७, १०४, युनीक कॅस्टल येथे श्रीमती गीता भरत जैन (माजी महापौर) हयांनी पाठविण्यात आलेले लिफाफा उघडुन वधितला असता मिरा भाईदर महानगर पालिकेचे वोध चिन्ह असलेले लेटर पॅड वर भरत मिठालाल जैन हयांनी दिनांक ०३.०१.२०१९ रोजी पत्र पाठविले होते. तसेच मिरा भाईदर शहरात ईतर नागरीकांना सुद्धा पत्र पाठविण्यत आले आहे.

माझ्या माहीतीप्रमाणे भरत मिठालाल जैन हयांनी मिरा भाईदर महानगरपालिका हयांचा कोणताही संवंध व्यक्ती नाही याचाच अर्थ सदर व्यक्तीने अनधिकृत रित्या मिरा भाईदर महानगरपालिकेचा वोध चिन्ह असलेला लेटर पॅड चा वापर केलेला आहे. हे नागरीकांना दिशा भुल करण्याचा प्रयत्न करीत आहे.

मिरा भाईदर महानगरपालिकेचे वोध चिन्हांचा अनधिकृत रीत्या वापर केला असल्याने संवधीत व्यक्तीविरूध्द आपण कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी ही नम्र विनंती.

स्वीय सहायक, महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

कळावे.,

पोच
13/02/2019
लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

पोच
आवक लिपीक
मिरा भाईंदर महानगरपालिका
13/02/2019

आपला विश्वासू,
(सजी आय.पी)

# Geeta Bharat Jain

**Ex. Mayor, Corporator**

**Mira Bhayandar Municipal Corporation**


Ref: GBJ/006/2019

Date: 03:01:2019

To the Respected Citizens of Mira Bhayandar,

Heartiest Greetings!

I, Bharat Mithalal Jain with my wife Geeta Bharat Jain would like to express our feelings with all the residents of Mira Bhayandar. In 1962 my father, Shri Mithalal Jain came to Mira Bhayandar and even today we with our extended family reside in the Mira Bhayandar region. With the blessings of parents, guru & Almighty God our family is leading a quality life.

Mira Bhayandar has given us a lot and with this thought we decided now is the time to give back to the land we belong to; so we decided to enter politics to fulfil this dream. Every day we meet people in thousands through various medium concerning their problems and issues. We are trying our best to solve their problems respectively.

For the betterment of the society, Mira Bhayandar has to rise above the caste & religion and work on a plan with dedication and sincerity for the next 10 to 15 years which requires thorough involvement and support from all the citizens. Initially, approximately 0.10% (approx.-1500) people will disagree with us however we believe 99.90% (approx. 14,98,500) people would provide us with the support we need.

Today in our country, people are either in favour of politics or have become a victim to politics. Hence, we request all of you to get united and help us work for making Mira Bhayandar an *Aadarsh Shahar*.

Thanking You!

Bharat Mithalal Jain & Geeta Bharat Jain


H. O. : Shop No 3 & 4 - B, Wing, Dev Agan Building, Opp Sheetal Kunj Building, Thakur Prasad Marg, Devchand Nagar, Bhayandar (West) 401 101

Office : Shop No. 11, Abhay Apt., Narayan Nagar, Opp. Baldev Bhavan, Bhayandar (W), Tal. Dist. Thane - 401 101. Tele / Fax : 28198888 Mob.: 9820502299

RIGHT TO INFORMATION

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/विधी/मा.अ./११/२०१७-१८
दि. ०१/०४/२०१९

प्रति,

श्री. साजी आय.पी.
शॉप नं. ८, हॅपी होम नं. १,
शांतीपार्क, मिरारोड (पूर्व)
जि. ठाणे.

**विषय :- केंद्र शासनाचा माहिती अधिकार २००५ अन्वये अर्ज.**

**संदर्भ :-** आपला दि. २५/०३/२०१९ (प्राप्त दि. २७/०३/१९) रोजीचा अर्ज.

**महोदय,**

संदर्भिय माहिती अधिकाराच्या अर्जान्वये आपण भरत मिठालाल जैन यांनी मिभामनपाचे बोध चिन्ह असलेले लेटर पॅड अनधिकृतरित्या वापरल्याबाबत कायदेशिर कार्यवाही करण्याकरीता दि. १३/०२/२०१९ रोजी दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपेक्षिली आहे. आपण संदर्भिय अर्जान्वये खालील मुद्यांची माहिती अपेक्षिली आहे.

१. गुन्हा दाखल केला असल्यास त्या संदर्भात संपुर्ण माहिती

२. आपल्या विभागामार्फत केलेल्या इतर सर्व कार्यवाहीची माहिती मिळणेबाबत.

तरी वरील मुद्यांनुसार आपणास कळविण्यात येते की, मनपाचा लोगो नोंदणीकृत करणेकरीता दि. १३/६/२०१४ रोजी मनपा सचिव यांनी प्रशासकिय ठराव क्र. ७६ दि. २९/४/२००२ रोजीच्या ठरावाची प्रत उपलब्ध करु सदरचा लोगो नोंदणीकृत करणेस विधी विभागास कळविले आहे. त्याअनुशंगाने विधी विभागाने लोगो रजिष्ट्रेशन कार्यालय, मुंबई यांच्याकडे पाठपुरावा करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ६३ व ६६ अन्वये पुरवित असलेल्या विविध सेवांच्या अनुशंगाने Class 35, Class 37, Class 39, Class 44, Class 45 विविध वर्गवारीनुसार (Class Wise) व्यापार चिन्ह रजिस्ट्रि कार्यालय, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन लोगो रजिष्ट्रेशन करुन घेण्याचे काम विधी विभागामार्फत करण्यात आलेले आहे. सदरचा लोगो वापरणेबाबत मनपामार्फत कोणत्याही प्रकारची नियमावली ठरविण्यात आलेली नाही. त्यामुळे मनपाच्या लोगोचा गैरवापर केल्याबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने इकडिल विभागाने मनपाचा लोगो नोंदणीकृत झाल्याची माहिती मनपाने दिलेल्या परवानगीव्यतिरिक्त इतर कोणासही सदरचा लोगो वापरता येणार नाही याबाबत जाहिर नोटिस प्रसिध्द करणेस, मिरा भाईंदर महानगरपालिका वापरीत असलेल्या लेटरहेडवर

मनपाच्या लोगोच्या वरील भागावर **TM** ऐवजी ® चा उल्लेख करणेकरीता, मनपाच्या नगरसेवक यांना मनपाचा लोगो त्यांच्या विनिर्दिष्ट केलेल्या वाहनावर, लेटर हेडवर छापणेकरीता परवानगी देणेबाबत, मनपाच्या लोगोचा कोणीही विनापरवानगी वापर झाल्याबाबत, विनापरवानगी लेटरहेडवर किंवा खाजगी जाहिरातीवर मनपाचा लोगो छापल्याची तक्रार प्राप्त झाल्यास किंवा निदर्शनास आल्यास यापुढे त्याविरुद्ध पुढील कायदेशिर कार्यवाही करणेकरीता याबाबतचा निर्णय घेणेकरीता अहवाल सादर केला असता मा. आयुक्त सो. यांनी लोकसभा निवडणूकीनंतर मा. महासभेपुढे विषय ठेवणेस आदेशित केलेले आहे. त्यानूसार इकडिल विभागामार्फत कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल. त्यामुळे आपण दि. १३/२/२०१९ रोजी दिलेल्या अर्जावर अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्यास आपणास मा. प्रथम अपिलीय अधिकारी, मा. उपायुक्त(मु), चौथा मजला, मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत प्रथम अपिल दाखल करता येईल.

Seenadke

सई वडके
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

C:\Users\Phatak\Desktop\D Data\MAHITI ADHIKAR\Saji I P.doc